
मराठी

# सुगमभारती

## इयत्ता आठवी



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# मैत्री तंत्रज्ञानाशी

(इयत्ता आठवीतील मीनल व इयत्ता दहावीतील तेजस या दोन बहीणभावंडांतील हा संवाद.)



**तेजस :** मीनल, ए मीनल. अगं, आता आपली शाळा लवकरच सुरू होणार आहे. आपण यावर्षी आणलेली नवीन पुस्तकं वाचायला हवीत. तू यावर्षीची नवीन पुस्तकं पाहिलीस का?

**मीनल :** हो दादा, अरे मी पुस्तकं वाचली नाहीत; पण बघितली आहेत.

**तेजस :** आवडली का तुला तुझी पुस्तकं ?

**मीनल :** अरे, मला तर माझी पुस्तकं खूपच आवडली. मागील वर्षापेक्षाही या वर्षीची पुस्तकं खूपच सुरेख आहेत. नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध, त्यांतील आकर्षक चित्रे, पाठांची मांडणी मला खूपच आवडली.

**तेजस :** अगं, मला पण माझी पुस्तकं खूप आवडली आहेत. अभ्यास करताना नक्कीच मजा येणार आहे.

**मीनल :** अरे, पण नवीन पुस्तकांत सर्व धड्यांखाली चौकटीत काहीतरी दिलेले आहे. ते काय आहे मला कळलंच नाही.

**तेजस :** दाखव बरं मला काय आहे ते!

**मीनल :** हे बघ. (पुस्तकातील पाठाखालील क्यू. आर. कोड दाखवते.)

**तेजस :** अगं, मीनल हा तर क्यू. आर. कोड आहे.

**मीनल :** क्यू. आर. कोड म्हणजे काय रे दादा? पूर्वीच्या पुस्तकांत तर असं काही दिलं जात नव्हतं!

**तेजस :** अगं, क्यू. आर. कोड म्हणजे क्विक रिस्पॉन्स कोड (Quick Response Code). अगं, मोबाईलवर क्यू. आर. कोड स्कॅनर हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर डाऊनलोड करावे लागते.या सॉफ्टवेअरद्‌वारे हा क्यू. आर. कोड स्कॅन केल्यानंतर आपल्याला पाठ, कविता, इतर घटक यासंबंधीच्या काही लिंक्स दिसतात. त्याद्‌वारा ऑडिओ, व्हिडिओ तसेच इतर पूरक साहित्य आपल्याला पहायला मिळते. आपण ते ऐकू शकतो, पाहू शकतो आणि वाचूही शकतो. अभ्यासासाठी त्याचा आपल्याला पुन्हा पुन्हा वापरही करता येऊ शकतो.

**मीनल :** अरे, हे तर खूपच छान आहे! आपल्या पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधीची माहिती खूपच कमी वेळात उपलब्ध होत असल्यामुळे विविध प्रकारचे साहित्य व माहिती शोधण्यासाठीचा आपला वेळही वाचणार आहे. चल दादा, आपण लगेच आपल्या मोबाईलवर हे ॲप डाऊनलोड करून घेऊया आणि अधिकाधिक माहिती मिळवूया.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



## मराठी

# सुगमभारती

## इयत्ता आठवी

### (संयुक्त भाषा)

**(उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इत्यादी माध्यमांच्या शाळांसाठी.)**

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.**

Q2G5V1

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८
तिसरे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‍धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती स्वाती ताडफळे | प्रा. विजय राठोड | श्रीमती नेहा रावते |
| डॉ. नंदा भोर | श्री. देविदास तारू | श्रीमती अन्वया काणे |
| डॉ. शारदा निवाते | श्रीमती प्रांजली जोशी | श्रीमती सुप्रिया खाडिलकर |
| श्रीमती अनुजा चव्हाण | श्रीमती वैदेही तारे | श्री. सुनिल बनसोडे |
| श्री. मोहन शिरसाट | डॉ. सुभाष राठोड | डॉ. जगदीश पाटील |
| श्री. प्रवीण खैरे | श्री. नाना लहाने | श्री. रमाकांत देशपांडे |
| श्री. प्रमोद डोंबे | श्रीमती प्रतिभा लोखंडे | श्री. नामदेव एडके |
| श्री. समाधान शिकेतोड | श्रीमती जयमाला मुळीक | श्री. रविंद्रदादा डोंगरदेव |
| श्री. बापू शिरसाठ | डॉ. मंजूषा सावरकर | श्री. दिलीप देशपांडे |
| श्री. मयुर लहाने | श्रीमती स्मिता जोशी | |

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**
श्री. हरी नारलावार

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
**चित्रकार** : गौरव गोगावले
**मुखपृष्ठ** : गौरव गोगावले
**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर, निर्मिती अधिकारी
**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/Qty.
**मुद्रक** : M/s

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता आठवीच्या वर्गात स्वागत आहे. 'सुगमभारती' हे मराठी संयुक्त भाषेचे तुमच्या आवडीचे पुस्तक! हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातांत देताना मनस्वी आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. एकमेकांशी संवाद साधताना, विचारांची देवाणघेवाण करताना, आपल्या भावना समोरील व्यक्तीसमोर मांडताना या भाषेचा प्रभावी व योग्य वापर करणे आवश्यक असते. यासाठी आपले आपल्या भाषेवर प्रभुत्व हवे. या पाठ्यपुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व नक्कीच वाढणार आहे, तसेच भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमणार आहे.

या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला वेगवेगळ्या साहित्यप्रकारांची ओळख करून दिली आहे. त्यांचा अभ्यास केल्याने मराठी भाषेचे शब्दवैभव किती विविधांगी आहे, हे तुमच्या लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे मुख्य साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा यासाठी या पुस्तकात अनेक कृती दिल्या आहेत. उदा., 'वाचा', 'चर्चा करूया', 'खेळूया शब्दांशी', 'लिहिते होऊया', 'शोध घेऊया', 'भाषेची गंमत', 'विचार करा. सांगा.', 'चला संवाद लिहूया', 'भाषासौंदर्य' यांसारख्या अनेक भाषिक कृती इत्यादी. पाठ्यपुस्तकातील 'उपक्रम' व 'प्रकल्प' यांमुळे तुम्हांला मिळवलेल्या ज्ञानाची सांगड दैनंदिन जीवनाशी घालून ते ज्ञान स्वप्रयत्नाने पक्के करता येणार आहे.

रोजच्या जीवनात तुम्ही तंत्रज्ञानाचा वापर करतच आहात. त्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात विविध कृती योजल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या कृतींचा अभ्यास तुम्हांला करायचा आहे. 'मैत्री तंत्रज्ञानाशी' या शीर्षकाखाली दिलेल्या नवीन माहितीचा उपयोगही तुम्हांला दैनंदिन व्यवहारात करायचा आहे. त्याचबरोबर 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली भाषाभ्यासाच्या दिलेल्या विविध कृती समजून घेऊन त्या सोडवायच्या आहेत. या सर्व प्रकारच्या भाषिक कृती करताना तुम्हांला नक्कीच मजा येणार आहे.

तुम्हां सर्वांना हे पाठ्यपुस्तक नक्कीच आवडेल अशी आशा आहे. तुमच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !

पुणे
दिनांक : १८ एप्रिल २०१८, अक्षय्य तृतीया
भारतीय सौर : २८ चैत्र १९४०

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : संयुक्त भाषा मराठी आठवी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>• आपल्या भाषेत बोलण्याची, चर्चा करण्याची, विश्लेषण करण्याची संधी दिली जावी.<br>• जीवनाशी संबंध जोडून विषय समजण्याच्या संधी दिल्या जाव्यात.<br>• वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>• गटात कार्य करणे आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारणे यांचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>• मराठीबरोबरच आपल्या भाषांतील साहित्य वाचण्याचे, लिहिण्याचे आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>• आपला परिसर, काळ आणि समाज यांच्याशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>• आपल्या भाषेची रचना करत असताना लिहिण्याच्या संदर्भातील क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, अनौपचारिक पत्र, कोडे, संस्मरण इत्यादी.<br>• सक्रियता आणि जागरूकता आणणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्रे, पत्रिका, चित्रपट आणि दृक्‌श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची संधी दिली जावी.<br>• कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास करण्याचे उपक्रम – अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सर्जनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद | इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसंदर्भात अपेक्षित अध्ययन निष्पत्ती–<br>08.LA.01 विविध विषयांवर आधारित विविध प्रकारचे साहित्य वाचून त्यावर चर्चा करतात. (उदा., पाठ्यपुस्तकातील एखाद्या पक्ष्याविषयीची माहिती वाचून पक्ष्यांविषयी लिहिलेले पुस्तक वाचतात व चर्चा करतात.)<br>08.LA.02 मराठी भाषेतील विविध प्रकारचे साहित्य/मजकूर (वर्तमानपत्रे, मासिके, कथा, इंटरनेटवर प्रसिद्ध होणारे इतर साहित्य) समजपूर्वक वाचतात, त्यांविषयी आपली आवड-नावड, मत, निष्कर्ष इत्यादी. तोंडी/सांकेतिक भाषेत व्यक्त करतात.<br>08.LA.03 वाचलेल्या साहित्यावर विचार करतात आणि अधिक समजून घेण्यासाठी प्रश्न विचारतात, चर्चा करतात.<br>08.LA.04 आपल्या परिसरातील विविध बोलींतील लोककथा, लोकगीते यांविषयी सांगतात/बोलतात.<br>08.LA.05 अपरिचित घटना, प्रसंग आणि परिस्थितीची कल्पना करतात आणि यांबाबत मनात तयार होणाऱ्या प्रतिमा व विचार यांबद्दल सांगतात व लिहितात.<br>08.LA.06 विविध संवेदनशील मुद्द्यांविषयी (उदा., जाती, धर्म, वर्ण, लिंग, रीतिरिवाज यांबाबत) आपले मित्र, शिक्षक आणि कुटुंबातील सदस्य यांना प्रश्न विचारतात. (उदा., परिसरातील लोकांच्या सण साजरे करण्याच्या पद्धतींबद्दल बोलणे.)<br>08.LA.07 एखादे साहित्य वाचून त्यातील सामाजिक मूल्यांविषयी चर्चा करतात, त्याची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. (उदा., शेजारच्या रामूकाकांची मुलगी शाळेत का जात नाही?)<br>08.LA.08 विविध प्रकारचे साहित्य जसे– कथा, कविता, लेख, अहवाल, वृत्तान्त, स्मरणपत्र, व्यंगचित्र, निबंध इत्यादींचे बारकाईने वाचन करून त्यांविषयी अनुमान काढतात, त्याचे विश्लेषण करतात, त्यांतील प्रमुख मुद्दे शोधतात. |

| अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित हस्तलिखित आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>• शाळा/विभाग/इयत्ता यांची पत्रिका भित्तिपत्रिका तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे. | 08.LA.09 वाचलेल्या साहित्यातील नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते यांचे अर्थ समजून घेतात, आस्वाद घेतात व उपयोग करतात.<br>08.LA.10 कथा, कविता वाचून लेखनाचे विविध प्रकार व शैली ओळखतात. (उदा., वर्णनात्मक, भावात्मक, निसर्गचित्रण.)<br>08.LA.11 एखादा मजकूर वाचताना तो समजून घेण्यासाठी आवश्यकतेनुसार वर्गमित्र/शिक्षक यांची मदत घेऊन उपयुक्त संदर्भसाहित्याची (शब्दकोश, विश्वकोश, इंटरनेट किंवा अन्य पुस्तकांची) मदत घेतात.<br>08.LA.12 विविध प्रकारचे साहित्य वाचताना (कथा, कविता, जाहिराती इत्यादी.) त्याच्या रचनेचा आस्वाद घेतात आणि त्यांबाबत आपापल्या कुवतीनुसार तोंडी, लेखी स्वरूपात विचार व्यक्त करतात.<br>08.LA.13 वाचन व लेखनाचा उद्‌देश लक्षात घेऊन आपले विचार प्रभावीपणे मांडतात.<br>08.LA.14 स्वत:चे अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहितात. लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून अनुभवलेखन करतात. (उदा., कथा, कविता, निबंध अशा वेगवेगळ्या पद्‌धतीने अनुभव लेखन करणे.)<br>08.LA.15 दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, स्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात. (उदा., सोशल मिडीयावर लिहिणे, संपादकांना पत्र लिहिणे.)<br>08.LA.16 विविध कलांमध्ये (उदा., हस्तकला, वास्तुकला, कृषिकला, नृत्यकला, चित्रकला) वापरल्या जाणाऱ्या भाषेचा सर्जनात्मक वापर करतात.<br>08.LA.17 अभिव्यक्तीच्या विविध शैली व रूपे ओळखतात आणि त्यानुसार स्वतः लिहितात. (जसे– विनोदी कथा, शौर्यकथा)<br>08.LA.18 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात. उदा., इयत्ता सातवीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी, वाक्य व वाक्यांचे प्रकार. |

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारत अमुचा देश... (गीत) | शरद कांबळे | १ |
| २. | चिव चिव चिमण्या... | विजय तेंडुलकर | २ |
| ३. | जिकडे तिकडे पाणीच पाणी (कविता) | शंकर वैद्य | ७ |
| ४. | सावलीतून जा आणि सावलीतून ये | सु. ह. जोशी | ९ |
| ५. | विश्वविख्यात शास्त्रज्ञ–स्टीफन हॉकिंग | डॉ. किशोर पवार, नलिनी पवार | १४ |
| ६. | कोळ्याची पोर (कविता) | सुरेखा गावंडे | १८ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ७. | ध्येयपूर्तीचा ध्यास | लक्ष्मण लोंढे | २१ |
| ८. | पाखरांचे मागणे (कविता) | प्रेमचंद अहिरराव | २७ |
| ९. | भूमिगत | मुमताज रहिमतपुरे | ३० |
| १०. | जीवन सुंदर करू! (कविता) | शं. ल. नाईक | ३५ |
| ११. | प्राणी आणि आपण | ललितगौरी डांगे | ३९ |
| १२. | संतवाणी | (अ) संत एकनाथ<br>(आ) संत श्रीनिळोबा | ४२ |